संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

अमृत सेवाभावी संस्था परभणी द्वारा संचालित,

"अमृतं तु विद्या ! विज्ञानं यज्ञ तनुते !!"

# कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय,

## लोणार जि.बुलडाणा-४४३३०२

## "राष्ट्रीय सेवा योजना"

- **"राष्ट्रीय पोषण महिना" निमित्त कार्यक्रमाचे आयोजन**
  - **"अॅनिमिया मुक्त भारत"**

कै. कु. दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय , लोणार येथे दिनांक २६ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी राष्ट्रीय पोषण महिना निमित्त **"अॅनिमिया मुक्त भारत"** कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजने च्यावतीने करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.संतोष क. बनमेरू, सचिव, अमृत सेवाभावी संस्था, परभणी तसेच प्रमुख मार्गदर्शक मा. अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम, महिला व बाल विकास अधिकारी पं. स. लोणार, कु. शिंगणे मॅडम, सौ. नवाळे मॅडम व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सूर्यकांत बोरुळ व महिला कार्यक्रमाधिकारी कु. प्रिती खरात हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमा पूजनांनी करण्यात आली व त्यानंतर विद्यापीठ गीताने घेण्यात व मंच्यावरील मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकामध्ये डॉ. सूर्यकांत बोरुळ , यांनी दिनांक १ ते ३० सप्टेंबर २०२२ हा महिना "राष्ट्रीय पोषण महिना" म्हणून सर्व भारतात साजरा करण्यात येत आहे. या मागील उदेश हाच आहे कि संपूर्ण भारत कुपोषण मुक्त, अनिमिया मुक्त करण्याच्या दुष्टीने हि अत्यंत महत्वाची पाउले आहे. आपले विद्यार्थी सुद्धा ह्या चळवळीचे घटक व्हावे व शासनाच्या कार्यात आपण सहभागी व्हावे यासाठी आज आपणास याठिकाणी मिळणारी सर्व माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी हि विद्यार्थ्यांची आहे असे स्पष्ट केले.

यांनतर प्रमुख मार्गदर्शक मा. अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम, महिला व बाल विकास अधिकारी पं. स. लोणार यांनी **"अॅनिमिया मुक्त भारत"** व "मासिक पाळी व्यवस्थापन" याविषयी Power Point Presentation च्या सहय्याने **"अॅनिमिया मुक्त भारत"** करण्यासाठी याचा अर्थ,

होण्यामागचे करणे व यावरील उपाय याची माहिती दिली. तसेच “मासिक पाळी व्यवस्थापन” यामध्ये सर्वांनी मासिक पाळी काळात महिलांना होणारा त्रास, वेदना, या काळात साधारणता पन्नास मिली रक्तस्राव होतो त्यामुळे त्यांचे शरीर कमजोर होते यासाठी त्यांना सकस पोषण आहार व मानसिक आधार आपण द्यावा हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. तसेच महिलांनी सुध्दा त्यांना मिळालेले हे निसर्गाचे एक मोठे वरदान आहे, त्यामुळे याबाबत संकोच बाळगू नये असे मत व्यक्त केले.

यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. संतोष क. बनमेरू यांनी कोणते फळे, तसेच आपल्या घरातील पदार्थ हे लोहयुक्त आहे याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच मुलीनी मासिक पाळी काळातील काही प्रश्न असल्यास निसंकोचपणे प्रमुख मार्गदर्शक मा. अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम यांना विचारावे असे मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश क. बनमेरू , यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत बोरुळ यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन पोफळे याने तर आभार प्रदर्शन गोपाल हेंद्रे यांने केले. सदर कार्यक्रमासाठी कु. शिंगणे मॅडम, नवाळे मॅडम व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **सदर कार्यक्रमाचे छायाचित्रे -**





महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करतांना मान्यवर, मा. सौ. ठाकरे, प्रमुख मार्गदर्शक यांचे स्वागत करतांना विद्यार्थिनी




मा. डॉ. संतोष बनमेरू, सचिव, अ.से.स.,परभणी व डॉ. सुर्यकांत बोरूळ, रासेयो कार्यक्रमधिकारी यांचे स्वागत करतांना महाविद्यालयातील विद्यार्थिनी






कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. सुर्यकांत बोरूळ, रासेयो कार्यक्रमधिकारी व मा. सौ. अश्विनी ठाकरे (सोने) मॅडम, विद्यर्थ्यांना मार्गदर्शन करतांना






“सही पोषण देश रोशन” नारा देतांना विद्यर्थ्यांना

## ➢ लोहयुक्त पदार्थांचे प्रदर्शन

कै. कु. दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय , लोणार राष्ट्रीय सेवा योजने च्यावतीने व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ सप्टेंबर २०२२ राष्ट्रीय पोषण महिना निमित्त **"लोहयुक्त पदार्थ प्रदर्शनाचे"** आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना आपल्या घरगुती कोणत्या पदार्थामध्ये किती प्रमाणात लोह आहे त्याचे महत्व काय हे समजावे त्यांना त्याची जाणीव व्हावी यासाठी सदर प्रदर्शन ठेवण्यात आले. सदर "लोहयुक्त पदार्थ प्रदर्शनाचे" उदघाटन मा. डॉ. संतोष क. बनमेरू, सचिव अमृत सेवा भावी संस्था परभणी, व मा. अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम, एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश क. बनमेरू , यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत बोरुळ यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पर्यवेक्षिका महिला व बाल विकास विभाग, प. स. लोणार , व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




"लोहयुक्त पदार्थ प्रदर्शनाचे" उदघाटन करतांना मा. डॉ.संतोष क. बनमेरू, व मा. अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम व इतर मान्यवर





## ➢ “online प्रश्न मंजुषाचे आयोजन ”

कै. कु. दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय , लोणार राष्ट्रीय सेवा योजने च्यावतीने व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ सप्टेंबर २०२२ पासून राष्ट्रीय पोषण महिना निमित्त राष्ट्रीय पोषणवर आधारित **“online प्रश्न मंजुषाचे आयोजन”** आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या तसेच जनसामान्यांच्या मनात पोषणाविषयी जनजागृती व्हावी व पर्यायाने कुपोषणाची टक्केवारी कमी व्हावी यासाठी सदर online प्रश्न मंजुषाचे आयोजन करण्यात आले.

online प्रश्न मंजुषाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. प्रकाश क. बनमेरू यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. यासाठी डॉ. सूर्यकांत बोरुळ, कार्यक्रमधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, व सौ. अश्विनी ठाकरे मॅडम, महिला व बाल विकास अधिकारी पं. स. लोणार यांनी परिश्रम घेतले.







राष्ट्रीय पोषण महिना निमित्त पोषणवर आधारित Online प्रश्न मंजुषे द्वारे विद्यार्थ्यांना प्राप्त होणारे प्रमाणपत्र

## ➢ पिंपळनेर येथे रान-भाजी व लोहयुक्त पाक कला प्रदर्शनाचे आयोजन

कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय , राष्ट्रीय सेवा योजना व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प लोणार यांच्या संयुक्त दिनांक ३० सप्टेंबर २०२२ रोजी दत्तक ग्राम पिंपळनेर ता.लोणार येथे राष्ट्रीय पोषण महिना निमित्त रानभाज्या तसेच लोहयुक्त पाक कलाकृतींचे प्रदर्शन ठेवण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार माननीय संजयजी रायमुलकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. वृषाली यादव मॅडम, गटविकास अधिकारी, अतिथी मा. पाटोळे साहेब , सहा.गटविकास अधिकारी , अतिथी पंचायत समिती लोणार , मा. राजगुरू सर, गट शिक्षण अधिकारी, मा.प्रा.बळीराम मापारी, जिल्हा शिवसेना प्रमुख, मा. संजय सानप, सरपंच पिंपळनेर, मा. सौ.अश्विनी ठाकरे मॅडम, बालविकास प्रकल्प अधिकारी, शिक्षकवृंद जि.प.शाळा, पिंपळनेर, प्रा. डॉ. सूर्यकांत बोरुळ, कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना हे उपस्थित होते.





रानभाज्या व लोहयुक्त पाक-कला प्रदर्शन उदघाटन समारंभात मंचच्या वरील मान्यवर




आमदार मा. डॉ.संजय रायमुलकर यांनी रानभाज्या प्रदर्शनास भेट दिली व प्राध्यापक व विद्यार्थ्या सोबत चर्चा केली.





मा. यादव मॅडम बि डी ओ व मा.पाटोळे साहेब सहा. बी डी, ओ. प. स. लोणार व सौ. ठाकरे मॅडम अधिकारी ए.ब.वी.प. यांनी रानभाज्या प्रदर्शनास भेट दिली.

रासेयो कार्यक्रमधिकारी प्राचार्य

- **सदर कार्यक्रमाचे वर्तमान पत्रातील प्रसिद्धी -**

# कै. कु. दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात "राष्ट्रीय पोषण महिना" निमित्त "अनिमिया मुक्त भारत" कार्यक्रमाचे आयोजन

**मेहकर टाईम्स्**
**विजय गोलेछा**
**खास - बातमी**

लोणार : कै कु. दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार राष्ट्रीय पोषण महिना निमित्त "अनिमिया मुक्त भारत" कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजने च्यावतीने करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.संतोष क. बनमेरू, सचिव, अमृत सेवाभावी संस्था, परभणी तसेच प्रमुख मार्गदर्शक अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम, महिला व बाल विकास अधिकारी पं. स. लोणार, कु. शिंगणे मॅडम, सौ. नवाळे मॅडम व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सूर्यकांत बोरुळ व महिला कार्यक्रमाधिकारी कु. प्रिती खरात हे उपस्थित होते. हा महिना "राष्ट्रीय पोषण महिना" म्हणून सर्व भारतात साजरा करण्यात येत आहे. या मागील उदेश हाच आहे कि संपूर्ण भारत कुपोषण मुक्त, अनिमिया मुक्त करण्याच्या दृष्टीने हि अत्यंत महत्वाची पाउले आहे.

आपले विद्यार्थी सुद्धा ह्या चळवळीचे घटक व्हावे व शासनाच्या कार्यात आपण सहभागी व्हावे यासाठी आज आपणास याठिकाणी मिळणारी सर्व माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी हि विद्यार्थ्यांची आहे असे स्पष्ट केले. Ok यांनतर प्रमुख मार्गदर्शक मा. अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम, महिला व बाल विकास अधिकारी पं. स. लोणार यांनी "अनिमिया मुक्त भारत" व "मासिक पाळी व्यवस्थापन" याविषयी Power Point Presentation च्या सहय्याने "अनिमिया मुक्त भारत" करण्यासाठी याचा अर्थ, होण्यामागचे करणे व यावरील उपाय याची माहिती दिली. तसेच "मासिक पाळी व्यवस्थापन" यामध्ये सर्वांनी मासिक पाळी काळात महिलांना होणारा त्रास, वेदना, या काळात साधारणता पन्नास मिली रक्तस्त्राव होतो त्यामुळे त्यांचे शरीर कमजोर होते यासाठी त्यांना सकस पोषण आहार व मानसिक आधार आपण द्यावा हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. तसेच महिलांनी सुध्दा त्यांना मिळालेले हे निसर्गाचे एक मोठे वरदान आहे, त्यामुळे याबाबत संकोच बाळगू नये असे मत व्यक्त केले. यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. संतोष क. बनमेरू यांनी कोणते फळे, तसेच आपल्या घरातील पदार्थ हे लोहयुक्त आहे याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच मुलींनी मासिक पाळी काळातील काही प्रश्न असल्यास निसंकोचपणे प्रमुख मार्गदर्शक मा. अश्विनी सोने (ठाकरे) मॅडम यांना विचारावे असे मत व्यक्त



केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन पोफळे याने तर आभार प्रदर्शन गोपाल हेंद्रे यांने केले.

**नवराष्ट्र**

# बनमेरू महाविद्यालयात 'ॲनिमियामुक्त भारत' कार्यक्रम

लोणार, (वा.). दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय पोषण महिनानिमित्त 'ॲनिमियामुक्त भारत' कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने करण्यात आले.

कार्यक्रमाचे सचिव अमृत सेवाभावी संस्था, परभणी अध्यक्ष डॉ. संतोष बनमेरू, तसेच प्रमुख मार्गदर्शक महिला व बालविकास अधिकारी पं. स. लोणार अश्विनी सोने (ठाकरे), शिंगणे, नवाळे व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सूर्यकांत बोरुळ व महिला कार्यक्रमाधिकारी प्रिती खरात हे उपस्थित होते. हा महिना राष्ट्रीय पोषण महिना म्हणून सर्व भारतात साजरा करण्यात येत आहे. या मागील उद्देश हाच आहे की संपूर्ण भारत कुपोषणमुक्त, अनिमियामुक्त करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची पाऊले आहे. आपले विद्यार्थी सुद्धा या चळवळीचे घटक व्हावे व शासनाच्या कार्यात आपण सहभागी व्हावे यासाठी आज आपणास याठिकाणी मिळणारी सर्व माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी ही विद्यार्थ्यांची असल्याचे स्पष्ट केले. यांनतर प्रमुख मार्गदर्शक अश्विनी सोने (ठाकरे), यांनी अनिमियामुक्त भारत व मासिक पाळी व्यवस्थापन याविषयी अनिमिया मुक्त भारत करण्यासाठी याचा अर्थ, होण्यामागचे कारणे व यावरील उपाय याची माहिती दिली.

यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. संतोष बनमेरू यांनी कोणते फळे, तसेच आपल्या घरातील पदार्थ हे लोहयुक्त आहे याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सदर कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन पोफळे याने तर आभार प्रदर्शन गोपाल हेंद्रे यांने केले.

Washim Buldhana Plus Edition
29 September 2022 Page No. 3
epaper.navarashtra.com

# अंगणवाडी सेविकांनी पोषण आहाराची घरोघरी जावून जनजागृती करावी - आ. रायमुलकर



देशोन्नती वृत्तसंकलन...

**लोणार** ■ एकात्मीक बाल विकास सेवा योजनेतंर्गत पिंपळनेर येथील जि.प.प्राथमीक शाळेच्या प्रांगणात पोषणा मेळावा रानभाज्या प्रदर्शनीचे तसेच स्वस्थ बालक - बालीका स्पर्धा बक्षिस वितरण कार्यक्रमाचे आयोजन ३० सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आ.डॉ.संजय रायमुलकर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, अंगणवाडी सेविकांनी पोषण आहारा संबधी घरोघरी जाऊन जनजागृती करुन शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यत कसा पोहचतील यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावे. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की रानभाज्याचा वापर आहारात करावा.बालके कृपोषीत राहू नये म्हणून जनजागृती करावी, प्रत्येकाने मुलीच्या जन्माचे स्वागत करावे, शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यत देता येईल यासाठी उपयोजना कराव्यात, यासाठीही अंगणवाडी सेविकांनी आपली जवाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी,असे प्रतिपादन केले. तसेच शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा.बळीराम मापारी, बीडीओ वृषाली यादव, सहाय्यक बीडीओ गजानन पाटोळे, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी अश्विनी ठाकरे यांनीही पोषण आहार व रानभाज्या विषयी मार्गदर्शन केले. तसेच स्वस्थ बालक बालीका स्पर्धामध्ये बालकाचे वजन उंची निकषावर आधारित स्पर्धा यामध्ये दक्ष ज्ञानेश्वर कायंदे,यश प्रभाकर मुंढे, देवांश ओम घायाळ यांना प्रमापत्र व बक्षिस वितरण करण्यात आले. तसेच माझी कन्या भाग्यश्री योजनेचे प्रमाणापत्र श्रेया किशोर डोईफोडे यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.तसेच कै.कु.दूर्गा बनमेरु महाविद्यालयांच्यावतीनेही राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महीला पोषण आहार व रानभाज्या प्रदर्शनीत सहभागी झाले होते.यावेळी सरपंच संजय सानप, शिवसेना तालुका प्रमुख भगवान पाटील सुलताने, युवासेना तालूका प्रमुख गजानन मापारी, सूर्यकांत बोरुळ, गटशिक्षण अधिकारी राजगुरु, उज्वला शिंगणे, विद्या लव्हाळे, सुनंदा अंभोरे, शारदा फड, सुनिता आघाव, शिवगंगा दराडे,प्रभावती देबाजे यांच्यासह महीला व अंगणवाडी सेवीका मदतनीस या कार्यक्रमास उपस्थीत होत्या.( वि.प्र.)